# पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ

# जिल्हा पोलीस राजपत्र

# दि - 01.11.2018

# भाग 1 - बदली /नेमणूक /पदोन्नती

## निरंक

# भाग 2 - रजा

क्रमांक : पोअय/पशा-२/अर्जित रजा-मंजुर/२०१८/14159 यवतमाळ, दिनांक : 31 OCT 2018

### आदेश

खालील नमुद लिपीक वर्गीय कर्मचारी यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे त्यांनी मागणी केलेल्या कारणास्तव अर्जीत रजा मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह मंजुर करण्यात येत आहे.

त्यांचे सदर रजेचे काळात त्यांचे नावासमोर दर्शविलेले लिपीक वर्गीय कर्मचारी हे स्वत:चे पदाचा पदभार सांभाळून त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार पाहतील.

| अ. क्र. | लिपीक वर्गीय कर्मचारी /कार्यालयीन शिपाई यांचे नांव/पदनाम व नेमणुक | रजा मंजुरीचे कारण | रजा कालावधी | अतिरिक्त कार्यभार |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.यु.बि.राजपुत वश्रेली | धार्मीक कामा करिता | दि.१२.११.२०१८ ते २२.११.२०१८ - ११ दिवस | श्री आर.एस.चव्हाण कश्रेली |
| २ | श्रीमती मंजुषा भगत कश्रेली | नागपुर येथे उपचारा करिता जाणे असल्याने | दि.१२.११.०१८ ते १६..११.२०१८- ५ दिवस | श्रीमती.तडसे कश्रेली |

( मा.पो.अ.यांचे मंजुरीने )

( एस.जी.सिंगारकर )
प्र.कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक यवतमाळ
करीता

क्रमांक : पोअय/पशा-२/अर्जित रजा-मंजुर/२०१८ 14204 यवतमाळ, दिनांक :- - 1 NOV 2018

## आदेश

खालील नमुद प्रमुख लिपीक यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे त्यांनी मागणी केलेल्या कारणास्तव किरकोळ रजा मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह मंजुर करण्यात येत आहे.

त्यांचे सदर रजेचे काळात त्यांचे नावासमोर दर्शविलेले प्रमुख लिपीक हे स्वत:चे पदाचा पदभार सांभाळून त्यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार पाहतील.

| अ. क्र. | प्रमुख लिपीक यांचे नांव/पदनाम व नेमणुक | रजा मंजुरीचे कारण | रजा कालावधी | अतिरिक्त कार्यभार |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती सुशिला पवार प्रलि पत्रव्यवहार शाखा | घरगुती महत्वाचे काम असल्याने | दि.५..११.२०१८ व ६.११.२०१८ - २ दिवस | श्री.पि.के.गिरोलीकर प्रलि लेखा शाखा |
| २ | श्री.डि.के.वनारे प्रलि प्रबंधक शाखा | दिपावली सणा निमित्य अकोला येथे जाणे असल्याने | दि.५..११.२०१८ व ६.११.२०१८ - २ दिवस | श्री.एस.जी.सिंगारकर प्र.काअ |

( मा.पो.अ.यांचे मंजुरीने )

( अनिलसिंह गौतम )
प्र.पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करिता

---

क्र. प्रलि/५१-डी/अर्जित.रजा-पोउपनि श्वान पथक-कार/ 14188 /२०१८ यवतमाळ, दिनांक - - 1 NOV 2018

## आदेश

पोउपनि/कपूरचंद कार, श्वान पथक यवतमाळ यांना धार्मिक कारणास्तव बाहेरगांवी जाण्यासाठी दिनांक ०५/११/२०१८ ते १०/११/२०१८ पर्यंत ०६ दिवस नैमित्तीक रजा (दि.०४.११.२०१८ चे साप्ताहिक रजेसह) मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह मंजूर करण्यात येत आहे. त्यांचे रजा कालावधीत त्यांचा कार्यभार सपोउपनि/चंद्रकांत अनविकर, श्वान पथक हे सांभाळतील.

**(पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने )**

( एस.जी.सिंगारकर )
प्र.कार्यालय अधीक्षक,
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करीता.

क्र. प्रलि/५१-डी/अर्जित रजा-पो.अधिकारी/14189/२०१८ यवतमाळ, दिनांक - 1 NOV 2018

**आदेश**

खालील नमुद पोलीस अधिकारी यांना, त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे **अर्जित रजा** मुख्यालय सोडण्याचे परवानगीसह कायदा व सुव्यवस्थेच्या अधिन राहुन मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नांव / पदनाम | मंजूर अर्जित रजेचा कालावधी | कार्यभार |
|---|---|---|---|
| १. | पोनि/धर्मा सुदाम सोनुने, नियंत्रण कक्ष, यवतमाळ | दि.०३.११.२०१८ ते १७/११/२०१८ पर्यंत १५ दिवस **अर्जित रजा** मंजूर. तथापी त्यांनी रजेवर रवाना होण्यापूर्वी वरिष्ठ अधिकारी यांची पूर्व परवानगी घेऊनच मुख्यालय सोडावे. | ---- |

वरील नमुद पोलीस अधिकारी यांनी रजा कालावधी संपताच वेळेवर कर्तव्यावर हजर राहावे तसेच रजेवर गेल्याची व रजा उपभोगुन परत आल्याची दिनांक व वेळ न चुकता या कार्यालयास कळवावी .

**( पो.अ.यांचे आदेशान्वये )**

**( एस.जी.सिंगारकर )**
प्र.कार्यालय अधीक्षक,
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करीता.

# भाग 3 - वेतन/भत्ते / रोखिकरण

## निरंक

# भाग 4 - बक्षिस / मानधन

## निरंक

# भाग 5-शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

क्रमांक:डीपी/३१-बी/पोहवा १२४५ठाकुर /निलंबन/ 14194 /२०१८ यवतमाळ दिनांक 1 NOV 2018

**निलंबन आदेश**

आपण पोहवा/१२४५ सुरेंद्रसिंग प्रल्हादसिंग ठाकुर पो.मु.यवतमाळ मिळालेल्या गोपनिय माहीतीवरुन आपण वसंतराव नाईक शासकिय महाविदयालय,यवतमाळ येथील श्रोतृ सभागृहाच्या मागील बाजुस असणा-या हनुमान मंदिराजवळ खुल्या जागेत सार्वजनिक ठिकाणी बेकायदेशिरीत्या गांजा या अंमली पदार्थाचे सेवन करतांना घटनास्थळी मिळुन आल्याने अप.क्र. १०३९/२०१८ कलम ८(क) २७ एन.डी.पी.एस.ॲक्ट १९८५ अन्वये दिनांक ३०/१०/२०१८ रोजी आपणाविरुध्द दाखल करण्यात आला.आपले कृत्य हे जनमानसात पोलीस खाल्याची प्रतिमा मलीन करणारे व शिस्तप्रीय खात्याला न शोभनारे आहे. ही बाब पोलीस खात्यास अशोभनीय असुन गैरवर्तणुकी बाबत मला प्राप्त अधिकारान्वये चौकशीचे अधिन आदेश दिनांक पासुन तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात येत आहे.

२ निलंबन काळात आपले मुख्यालय, पोलीस मुख्यालय यवतमाळ हे निश्चीत करण्यात येत आहे. आपले निलंबन काळात आपण पोलीस उपअधिक्षक मुख्यालय यवतमाळ हयांचे पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडु नये. या निश्चीत केलेल्या मुख्यालयात आपण दररोज न चुकता हजेरी द्यावी.

३. निलंबन काळात आपणांस निर्वाह भत्ता अस्तीत्वात असलेल्या नियमाप्रमाणे देण्यात येईल. आपण दर महिन्याला निर्वाह भत्ता घेण्यापुर्वी अगोदरच्या महिन्यात (ज्या महिन्याचा त्यांना निर्वाह भत्ता घ्यावयाचा आहे तो महिना) आपण कोणतीही खाजगी नोकरी अथवा कोणताही खाजगी व्यवसाय/ उद्योग केलेला नाही त्याबद्दलचे प्रमाणपत्र द्यावे लागेल.

४. आपणांस असेही सुचीत करण्यात येते की, निलंबन काळातही आपण पोलीस कर्मचारी म्हणुन राहाल निलंबित नसतांना जी जबाबदारी शिस्त व शिक्षा आपणांस लागु होत्या त्याच त्यानां आताही लागु राहतील. फक्त आपले अधिकार कार्य व विशेष सुविधा निलंबन काळात तात्पुरते तहकुब राहतील.

५. पुढे आपणांस असेही सुचीत करण्यात येते की, निलंबन काळात कोणतीही खाजगी नोकरी अथवा व्यवसाय/ उद्योग करण्याची आपणांस परवानगी नाही. जर आपण आपले निलंबन काळात खाजगी नोकरी अथवा खाजगी व्यवसाय/उद्योग केला तर ही गैरवर्तणुक ठरेल व त्याबद्दल आपले विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. अशा प्रकरणात आपला निर्वाह भत्त्यावर अधिकार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

( एम.राज कुमार )
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

क्र माकः डीपी/३१ बी/सपोनि-राऊत/नि.मुक्त/ 14173 /२०१८. यवतमाळ दिनांक : 31 OCT 2018

**निलंबन मुक्त आदेश**

सपोनि राहुलकुमार राऊत सलग्न पोलीस नियंत्रण कक्ष यांना त्यांच्या विरुध्द दाखल फौजदारी गुन्हयात गुन्हयाच्या व्यतीरीक्त चौकशीच्या अधिन या कार्यालयाचे आदेश क्रमांक:डिपी/३१-बी/निलंबन सपोनि-राऊत /८६३६/२०१८ दिनांक २८/०६/२०१८ अन्वये आदेश दिनांकापासुन निलंबित करण्यात आले होते. त्यांचे निलंबनाचे मा. पो.म.स यांचे परीपत्रक दिनांक १०/०२/२०१६ मधील निर्देशान्वये दि. ३०/१०/२०१८ रोजी पुर्न:विलोकन करुन मा. न्यायनिर्णयाचे निर्णयाचे अधीन आदेश स्विकारल्याचे दिनांकापासुन त्यांना निलंबनातुन मुक्त करण्यात येत आहे.

( एम.राज कुमार )
पोलीस अधीक्षक,यवतमाळ.

# भाग 6 - प्रशिक्षण व इतर

## निरंक

—— समाप्त ——